सोलापूर
प्रखर राष्ट्रीय विचारांचे दैनिक
तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
संभाजीनगर, सातारा, सोलापूर, अहमदनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून प्रकाशित
epaper.dainiktarunbharat.com
19 Sep 2024 - Page 15

# सायबर शिक्षा फॉर सुरक्षा विषयावर प्रतीक्षा पांगे यांचे मार्गदर्शन



**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.१८ सप्टेंबर -**

कीक हिल फाऊंडेशन व राजर्षी शाहू महाविद्यालय लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने सायबर शिक्षा फोर सायबर सुरक्षा हा कार्यक्रम उमरगा विधीज्ञ येथे प्रतीक्षा रमेश पांगे हिने सेक्सटोर्शन आणि पोर्नोग्राफी, सायबर शिक्षा फॉर सुरक्षा या विषयावर मार्गदर्शन आयोजित करण्यात आले होते.

या कार्यक्रमात न्यायाधीश पी.बी. रेमणे,जी.पी.बनकर मॅडम,एस.एच.राठी मॅडम यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी प्रतिक्षा पांगे यांचे विधीज्ञ मंडळाच्या वतीने स्वागत करण्यात आले. त्यानंतर या मार्गदर्शनास सुरुवात झाली.

आपल्या मार्गदर्शनातून प्रतिक्षा पांगे यांनी सायबर गुन्हे, सोशल मीडिया,मोबाईल प्लिकेशन यातून सायबर क्राईम,होणारी अर्थिक फसवणूक या समस्या कशा निर्माण होतात याचे ज्वलंत उदाहरणावरून विधीज्ञ यांना मार्गदर्शन केले,त्याचबरोबर यातून आपण,आपले कुटुंब व समाज कसे सुरक्षित राहू शकते याची माहिती उपस्थितांना दिली.

मोबाईल फोन, सोशल नेटवर्किंग,वेब साईट वापर स्नॅपचॅट, इंस्टाग्राम अशा ॲपवर नकळतपणे होणाऱ्या चुका आणि त्यामुळे होणारा मनस्ताप, बँकिंग फ्रॉडमुळे होणारे आर्थिक नुकसान टाळण्यासाठी त्यांनी विधीज्ञांना अनेक युक्त्या सांगितल्या. त्यातील समस्या व उपाययोजना याबद्दल यथोचित माहिती सांगितले.

तर सर्व उपस्थितांना सायबर सेक्यूरिटीची शपथ देण्यात आली.

यावेळी ॲड.मोहन कोथिंबिरे, ॲड. जी.के.गायकवाड, ॲड.आर.एम.इंगळे, ॲड.संजय पाटील, ॲड.बी.जी.माळी. ॲड.मोहन चिंचोलीकर, ॲड.दिलीप सागर,ॲड.व्ही.एस.आळंगे, सरकारी वकील ॲड.एस.एम.देशपांडे, ॲड.सुषमा घोडके, ॲड.प्रभाकर बिराजदार, ड.राहुल जाधव, ॲड.प्रवीण पाटील, ॲड.डी.एम. कातपूरे, ॲड. शुभदा पोतदार, ॲड. एम.डी.गायकवाड, ॲड.अशोक पोतदार, ॲड.वर्षा जाधव, ॲड. सुशील शिंदे, ॲड. काशिनाथ राठोड, ॲड.साई टाचले आदींसह सर्व विधीज्ञ उपस्थितीत होते.

महिलांनी आपला फोटो मोबाईलच्या डीपी ला किंवा फेसबुक वर शेअर करू नये त्याचा हॅकर कडून मिस युज करून ब्लॅकमेल केले जाऊ शकते. त्यामुळे महिलांनी आपला फोटो मोबाईलच्या डीपीला किंवा फेसबुक वर शेअर करू नये तसेच दर तीन-चार महिन्याला आपला इमेल आयडी पासवर्ड सेक्युरिटी सेफ्टीसाठी बदलणे अत्यावश्यक आहे.

आपण मोबाईलचे ॲप वापरत असताना परमिशन मागते त्यावेळेस फक्त Allow When App Used यालाच परमिशन द्यावी. इतर कोणतीही परमिशन देऊ नये.

मोबाईलचा समोरचा कॅमेरा हा आपल्यावर सतत २४ तास नजर ठेवत असतो त्यामुळे वापर चांगला व्हावा याची दक्षता घ्यावी..

आपला ओटीपी कधीही अनोळखी व्यक्तीला सांगू नका किंवा शेअर करू नका त्याचबरोबर कोणत्याही अनोळखी लिंक वर क्लिक करू नका.

मोबाईल वापरते वेळी आपली फसवणूक झाल्याचे समजतात १९३० या हेल्पलाइन नंबर वर संपर्क करा अन्यथा https://cybercrime.gov.in/या वेबसाईटवर तक्रार नोंदवा